# मुंबई विद्यापीठ, मुंबई

## मुंबई विद्यापीठाच्या ‘कुलगुरू’पदासाठी शोध समितीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहे.

मुंबई विद्यापीठाची स्थापना १८५७ साली झाली असून, हे भारतातील नामवंत विद्यापीठांमध्ये गणल्या जाणाऱ्या जुन्या विद्यापीठांपैकी एक आहे. विद्यापीठाचे कार्यक्षेत्र फोर्ट व कलिना, विद्यानगरी येथे विस्तारित असून, विद्यापीठाची उपकेंद्रे ठाणे, कल्याण व रत्नागिरी येथे आहेत. सद्यःस्थितीत विद्यापीठात ५१ विभाग/संस्था/केंद्र/विशेष उपक्रम केंद्र, ५ स्वायत्त विभाग, १ घटक महाविद्यालय, २ आदर्श महाविद्यालये व २ समुदाय महाविद्यालये कार्यरत आहेत. या विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्रामध्ये मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग असे एकूण ६ जिल्हे आहेत, सदर जिल्ह्यांमध्ये ७४० महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित आहेत, त्यापैकी ७ स्वायत्त महाविद्यालये असून, प्रतिवर्षी ७ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यापीठाच्या विज्ञान, कला, वाणिज्य, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, समाजशास्त्र, मानवशास्त्र, विविध भाषा व ललित कला या शाखांमधून ४४० अभ्यासक्रम राबविण्यात येतात. ‘राष्ट्रीय आकलन आणि प्रमाणन परिषदेद्वारे (NAAC) विद्यापीठास पुनर्मूल्यांकित ‘अ’ श्रेणी मिळालेली असून, ‘विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) व विज्ञान व तंत्रज्ञान विभाग (DST) यांनी विद्यापीठास ‘श्रेष्ठत्व सक्षम विद्यापीठ’ (University with Potential for Excellence) म्हणून गौरविले आहे. विद्यापीठाने सन २०११-१२ पासून ‘गुणपरत्वे श्रेणीकरण प्रणाली’ (CBCS) लागू केली आहे. विद्यापीठाने ‘नॅनो विज्ञान व नॅनो तंत्रज्ञान’ या विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या संशोधन कार्याकरिता जागतिक दर्जाचे आधुनिक, सर्व सोयींयुक्त असे संशोधन केंद्र आहे. तसेच विद्यापीठाच्या ‘मूलभूत विज्ञान’ विभागाद्वारे मूलभूत विज्ञानाच्या विविध शाखांकरिता पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविले जातात. विद्यापीठाने अग्रगण्य राष्ट्रीय, तसेच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसोबत अनेक सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठाने क्रीडा, सांस्कृतिक व इतर कार्यक्षेत्रांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ नुसार कुलगुरूपदाची निवड प्रक्रिया पूर्ण पारदर्शकतेने असावी हे उद्दिष्ट असून, कुलगुरू म्हणून नियुक्त होणारी व्यक्ती ही प्रख्यात विद्यावान, नेतृत्व गुण व प्रशासकीय क्षमता धारण करणारी असावी, ज्यामुळे ती व्यक्ती विद्यापीठाला शैक्षणिक आणि व्यावसायिकदृष्ट्या सर्वोत्कृष्ट दर्जाचे केंद्र बनवेल.

कुलपती व मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी कुलगुरूपदासाठी सुयोग्य व्यक्तीच्या नावाची शिफारस करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठित केली आहे. ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश श्री.बी.एन. श्रीकृष्ण (अध्यक्ष), अतिरिक्त मुख्य सचिव श्री. के.पी. बक्षी (आय.ए.एस.), गृह विभाग, महाराष्ट्र शासन (सदस्य) व डॉ. सतीश वटे, संचालक राष्ट्रीय पर्यावरण व अभियांत्रिकी संशोधन संस्था, (NEERI) नागपूर (सदस्य) यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

दिनांक २७ मे २००९ च्या शासन आदेशानुसार ज्या व्यक्तीकडे कुलगुरू पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव आहे व ते आव्हानात्मक कार्य स्वीकारण्यास इच्छुक आहेत, अशा उच्च विद्याविभूषित व्यक्तींकडून उपरोक्त शोधसमिती अर्ज/ नामनिर्देशन मागवीत आहे. या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव, इष्टतम अनुभव आणि कौशल्ये व नैपुण्ये याबाबतची आवश्यक ती तपशीलवार माहिती, तसेच अर्जाचा नमुना मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर पदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नमुन्यानुसार स्वतःच्या तपशीलवार माहितीसह त्यांचे/तिचे सदर पदाच्या उमेदवारीबाबत दोन पृष्ठांएवढे समर्थन, त्यांची विद्यापीठाच्या उत्कर्षाबाबतची दूरदृष्टी (vision) व्यक्त करणारी दोन पृष्ठे, त्यांच्या/तिच्या कामकाजाची ओळख असलेल्या तीन नामांकित व्यक्तींची नावे व संपर्क पत्ते नमूद करावीत. तसेच विविध संस्थांनीसुद्धा सुयोग्य अशा उमेदवारांची नामनिर्देशने पाठवावीत.

सदर शोध समितीने डॉ. मधू मदान, अधिष्ठाता, शैक्षणिक व प्रमुख मूल्यमापन, सिंबॉयसिस दूरशिक्षण अध्ययन केंद्र, पुणे यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे.

इच्छुक उमेदवारांनी/ नामनिर्देशकांनी त्यांचे अर्ज/नामांकने विहित नमुन्यात चार प्रतीत व त्याचसोबत संगणकीकृत प्रत (Soft Copy) संपर्क संपर्क अधिकारी यांच्याकडे दिनांक १५ मे २०१५ रोजी किंवा त्यापूर्वी पोहोचतील, अशा रीतीने खालील पत्त्यावर पाठवावीत. सदर तारखेनंतर आलेले अर्ज/नामांकने विचारात घेतली जाणार नाहीत.

**Address:** **Dr. Madhu Madan**
**(Nodal Officer - Search Committee)**
**Symbiosis Centre for Distance Learning,**
**1065-B, Gokhale Cross Road, Model Colony,**
**Pune-411 016**
**Mobile No.** **09920011637**
**Email:** **madhunodalmumbai@gmail.com**

शोध समितीस आवश्यकता भासल्यास संक्षिप्त निवड सूचीतील (Short Listed) उमेदवारांना विचारांच्या आदानप्रदानासाठी आमंत्रित करेल.

शैक्षणिक प्रशासकांना उच्च शिक्षण क्षेत्रातील नवनवीन कल्पना, संशोधने प्रत्यक्षात उतरविण्यासाठी व विद्यार्थी समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी व विद्यापीठासारख्या प्रतिष्ठित अशा शैक्षणिक संस्थेस सर्वोत्कृष्ट बनविण्यासाठी ही सुसंधी लाभत आहे.

दिनांक :- ०२ एप्रिल २०१५

**अध्यक्ष,**
**शोध समिती**